| अ.न. | पदवी अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | बी. ए. (सामान्य विषय : इतिहास)<br>स्पेशल विषय: मराठी, इंग्रजी, हिंदी, भूगोल, अर्थशास्त्र, | प्रथम वर्ष : १२०<br>द्वितीय वर्ष : १२०<br>तृतीय वर्ष : १२० | ०३ वर्ष |
| २. | बी. एस्सी. : (सामान्य विषय : वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, पदार्थविज्ञान, गणित, मराठी)<br>स्पेशल विषय: रसायनशास्त्र, | प्रथम वर्ष : १२०<br>द्वितीय वर्ष : १२०<br>तृतीय वर्ष : १२० | ०३ वर्ष |
| ३. | बी. कॉम. : Business Economics, Computer Concept and Programming, Marathi / Hindi, Marketing and Salesmanship, Banking & Finance, Financial Accounting, Compulsory English.<br>स्पेशल विषय : Business Administration, Banking and Finance | प्रथम वर्ष : १२०<br>द्वितीय वर्ष : १२०<br>तृतीय वर्ष : १२० | ०३ वर्ष |

| अ.न. | पदव्युत्तर अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | एम. एस्सी. : रसायनशास्त्र (Organic Chemistry) | प्रथम वर्ष : २४<br>द्वितीय वर्ष : २४ | ०२ वर्ष |
| २. | एम. एस्सी. : रसायनशास्त्र (Analytical Chemistry) | प्रथम वर्ष : २४<br>द्वितीय वर्ष : २४ | ०२ वर्ष |
| ३. | एम. कॉम. : Business Administration | प्रथम वर्ष : ६०<br>द्वितीय वर्ष : ६० | ०२ वर्ष |

**Certificate Course :** Spoken English and Communication Skills, Advance Computer skills, GIS, Soil and Water Analysis, E-banking, Tally Accounting, Personality Development & Interview Techniques, Tourism Management, Yoga, Medical Lab Techniques, Computer Literacy, Human Values & Ethics, Fruits & Vegetable Drying Dehydration Technology, Journalism, Organic Farming, Renewable Energy, Event Management etc.

**Career Katta :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने Career Katta या उपक्रमांतर्गत IAS आपल्या भेटीला व उदयोजक आपल्या भेटीला





















## संपर्क

डॉ.एस.आर.जाधव (प्राचार्य) ९६५७७९१२७७
प्रा.डी.डी.दाभाडे (उपप्राचार्य) ८३९०१२१०४३
डॉ.ए.आर.घोलप ९६८९८३३९५५
डॉ.आर.बी.गायकर ९९७५७१४३८२
डॉ.एस.डी.भुमकर ९७३०८०७२०९
प्रा.जी.आर.शेळके ८४१२०५६२६३
डॉ.ए.बी.घोलप ९६६५६८४७०६
प्रा.एल.एम.शेख ९१५६४१२५१२
प्रा.एस.एस.वर्पे ९६०४५४१२७३
प्रा.एम.एम.पटेल ९९७५७६३५२७

**Visit : www.ashvicollege.in**




PRAVARA 1964

लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील
(पद्मभूषण उपाधिने सन्मानित)
प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे

# कला, वाणिज्य, विज्ञान व संगणकशास्त्र महाविद्यालय,

आश्वी खुर्द, ता. संगमनेर, जि. अहमदनगर.
Email: principal.acsashvi@pravara.in
Website: http//ashvicollege.in
नॅक बी++ मानांकन प्राप्त महाविद्यालय

## माहिती पत्रक

### शैक्षणिक वर्ष २०२३-२४



## कला, वाणिज्य , विज्ञान व संगणक शास्त्र महाविद्यालय, आश्वी खुर्द

सहकाराचे जनक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी आशिया खंडातील पहिल्या सहकारी साखर कारखान्याची मुहूर्तमेढ रोवून ग्रामीण भागातील शेतकर्यांना स्वावलंबी बनविले. सन १९०१ मध्ये प्रवरा नदीच्या कुशीत वसलेल्या लोणी या खेडेगावात एका शेतकरी कुटूंबात जन्मलेल्या पद्मश्रींनी सहकारी चळवळीच्या माध्यमातून सर्वसामान्य शेतकरी व कष्टकरी समाजाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली व सहकारातून समृद्धीचा राजमार्ग दाखविला.

पद्मश्रींनी सहकाराबरोबर शिक्षणाची ज्ञानगंगा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांपर्यंत पोहचविली. ग्रामीण समाजाचे सर्व प्रकारचे दारिद्रय नष्ट करावयाचे असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, अशी पद्मश्रींची ठाम श्रद्धा होती. या श्रद्धेतून सन १९६४ साली प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांबरोबरच उच्चशिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांची स्थापना केली.

पद्मश्री चे हे शिक्षणाचे कार्य विस्तारीत करण्यासाठी पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पारंपारिक शिक्षणाबरोबरच तांत्रिक शिक्षण उपलब्ध करून दिले. सहकार, कृषी, ग्रामीण अर्थकारण, राजकीय तसेच संत परंपरा, धार्मिक या क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे.

परिसरातील विद्यार्थ्यांसाठी विशेषत: विद्यार्थिनींसाठी उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी या उद्दात्त हेतूने आश्वी खु.।। येथे सन २००१ साली कला, वाणिज्य , विज्ञान व संगणक शास्त्र महाविद्यालयाची स्थापना केली. आज प्रवरा परिसराचे भाग्यविधाते सन्मा. आमदार श्री.राधाकृष्ण विखे पाटील (मंत्री, महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास, महाराष्ट्र राज्य) हे या ज्ञानदानाच्या कार्याची धुरा समर्थपणे सांभाळत आहेत. मा. खासदार डॉ. सुजयदादा विखे पाटील यांचे बहुमोल मार्गदर्शनाखाली महाविद्यालय गरुडझेप घेत आहे. अवघ्या १४१ विद्यार्थी संख्येवर सुरु झालेले महाविद्यालय रौप्य महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करीत असून सध्या ८०० पेक्षा जास्त विद्यार्थी-विद्यार्थीनी महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत. निसर्गरम्य परिसरात महाविद्यालयाची सुसज्ज इमारत उभारण्यात आलेली आहे. ग्रंथालय, अत्याधुनिक प्रयोगशाळा, सुसज्ज जिमखाना , विविध क्रीडा प्रकारांची मैदाने इ. सुविधांनी महाविद्यालय परिपूर्ण आहे. महाविद्यालयात पदवी पासून ते पदव्युत्तर शिक्षणापर्यंतची सोय उपलब्ध असून बदलत्या काळाची आव्हाने समर्थपणे पेलण्यासाठी ग्रामीण युवक-युवतींचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने महाविद्यालयाने दर्जेदार बौद्धिक शिक्षणाबरोबरच कला, साहित्य, सांस्कृतिक, क्रीडा व व्यक्तिमत्वविकास या बाबींनाही नेहमीच अग्रक्रम दिला आहे.

बेंगलोर येथील नॅक समितीने महाविद्यालयाला भेट देऊन मुल्यांकनात'बी ++ ' मानांकन बहाल केले आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवून उज्वल शैक्षणिक परंपरा टिकवून ठेवण्याकडे नेहमीच लक्ष दिलेले आहे. संपुर्ण परीसराच्या शैक्षणिक विकासाचा केंद्रबिंदू असलेल्या या विकसनशील महाविद्यालयाची माहितीपत्रिका आपल्या हाती देताना आम्हास अतिशय आनंद होत आहे.

### महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये :

१) नॅक मुल्यांकन बी + + (CGPA 2.89) मानांकन प्राप्त महाविद्यालय.
२) सेट, नेट, एम. फिल व पी एच. डी. इत्यादी उच्चविद्याविभूषीत अनुभवी प्राध्यापक वृंद
३) भव्य इमारत, अद्ययावत प्रयोगशाळा, सुसज्ज ग्रंथालय व इंटरनेट सुविधा
४) गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी कमवा व शिका योजना
५) स्मार्ट क्लासरूम
६) राष्ट्रीय सेवा योजना (NSS), राष्ट्रीय छात्र सेना (NCC)
७) ई.बी.सी. सवलत तसेच सर्व प्रकारच्या शासकीय शिष्यवृत्ती
८) व्यक्तिमत्व विकास केंद्र
९) करिअर मार्गदर्शन केंद्र
१०) विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक मार्गदर्शन
११) पोलीस/आर्मी भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र
१२) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
१३) स्पर्धा परीक्षा अभ्यासिका व ग्रंथालय
१४) राज्य, राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय पातळीवरील परीषदा, चार्सत्रे, कार्यशाळा इ. चे आयोजन
१५) प्लेसमेंट सेल
१६) २०० मी. रनिंग ट्रॅक, अत्याधुनिक जिम व प्रशस्त क्रीडा मैदानाची सुविधा
१७) विद्यार्थी दत्तक पालक योजना
१८) कौशल्य विकास केंद्र
१९) मोफत संगणक शिक्षण
२०) उत्कृष्ठ निकालाची परंपरा
२१) बस सुविधा

### महाविद्यालयातील योजना :

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला हातभार लागावा तसेच एक परिपूर्ण नागरिक घडवण्याच्या उद्देशाने महाविद्यालय विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करते.

**शिष्यवृत्ती विभाग :** महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या व शासकीय नियमाप्रमाणे पात्र असलेल्या सर्व विद्यार्थ्याना शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडील शिष्यवृत्ती, गरीब विद्यार्थी अर्थसहाय्य योजना इत्यादी शिष्यवृत्ती उपलब्ध आहे. यामुळे विद्यार्थ्यांना आपले उच्च शिक्षण घेण्यास हातभार लागतो.

**राष्ट्रीय सेवा योजना (NSS):** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकीची जाणीव, व्यक्तिमत्व विकास आणि त्यांच्यावर श्रमसंस्कार व्हावेत या उद्देशाने हि योजना राबविली जाते. हि योजना पूर्णतः ऐच्छिक असून दरवर्षी दोनशे पन्नास विद्यार्थ्याना या योजनेत प्रवेश दिला जातो.योजनेचे दरवर्षी सात दिवसांचे श्रमसंस्कार शिबीर आयोजित केले जाते.

**राष्ट्रीय छात्र सेना (NCC):** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देशाप्रती आदर, निष्टा, प्रेमअसलेले साहसी युवक युवती तयार करणे हा राष्ट्रीय छात्र सेनेचा प्रमुख उद्देश आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये महाविद्यालयाला ५३ मुलांच्या राष्ट्रीय छात्र सेना युनिटला परवानगी मिळाली आहे. या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये धैर्य, शिस्त, नेतृत्व, धर्मनिरपेक्ष दृष्टीकोन, चारित्र्य, साहस व क्रीडा कौशल्य हे गुण विकसित करण्यासाठी प्रयत्न केले जातात.

**विविध शैक्षणिक सुविधा :** महाविद्यालयात विविध विषयांसाठी अनुभवी प्रशिक्षित प्राध्यापक वृंद आहे. समाजातील सामान्य विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नवीन अध्यापन पद्धतीचा महाविद्यालयात अवलंब केला जातो. यासाठी आधुनिक शैक्षणिक साधनांनी महाविद्यालय सुसज्ज आहे.

**ग्रंथालय :** विद्यार्थी व प्राध्यापकांच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीने १२९२५ पुस्तके, १२२३ संदर्भग्रंथ व ९ नियतकालिक संशोधात्मक पत्रिका उपलब्ध आहे. ई-जर्नल सुविधा उपलब्ध असून ३१ लाख ३५ हजार, ई-बुक व विविध विषयांचे ६ हजार ई-जर्नल्स उपलब्ध असल्यामुळे ग्रंथालय समृद्ध बनले आहे. महाविद्यालय गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना वर्षभर विनामूल्य बुकबँक सेवा देते.

**प्रयोगशाळा :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नियमानुसार सर्व अत्याधुनिक शास्त्रीय उपकरणांनी सुसज्ज अशा स्वतंत्र प्रयोगशाळा पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, भूगोल, संगणक, इंग्लिश व वाणिज्य इत्यादी विषयांच्या आहेत.

**अभ्यासक्रम :** महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान या शाखांचे पदवी व पदव्युत्तर शिक्षण उपलब्ध आहे.